गृ.नि. व वि.स. वि./सचिव
कार्यालय,

दिनांक ८.४.२००० रोजी प्राधिकरणाची [redacted]वी बैठक संपन्न झाली,

त्याचे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर केले आहे. कृपया मान्यता द्यावी.

( वि.एस. धुमाळ ) २६/४/२०००
सचिव, (गृहनिर्माण)

814
26.4.2000

मा. मुख्यमंत्री

अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

6 MAY 2000

झो. प. प्रा.
मु.का.अ कार्यालय
क्र.: 850
दिनांक: 9/5

Xerox काढून
सर्व HOD ना

दिनांक: 26/7/2000

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र.झोपुप्रा/९वी बैठक/प्र.क्र.५५/११३०
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक : 17 APR 2000

प्रति,
सचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नवव्या बैठकीच्या कार्यवृत्तास व इतिवृत्तास मंजूरी मिळण्याबाबत.**

महोदय,

प्राधिकरणाची नववी बैठक दि.८.४.२००० रोजी दुपारी २ ते ३ या वेळेत सहयाद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त तयार करून मान्यतेसाठी सादर केले आहे. तसेच विहीत नमुन्यातील इतिवृत्तही तक्ता 'अ' व 'ब ' प्रमाणे सोबत सादर केले आहेत. तरी प्रस्तुत कार्यवृत्त पुढील बैठकीत पक्के होण्याची वाट न पहाता, झालेल्या निर्णयावर मा.अध्यक्षांचे मान्यतेनंतर कार्यवाही सुरू करण्याची परवानगी असावी.

सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना विनंती आहे की, त्यांनी प्रस्तुत बैठकीचे कार्यवृत्तास मा.अध्यक्षांची मान्यता घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत पाठवावेत.

**सहपत्रे** १. कार्यवृत्त.
२. इतिवृत्त.

आपला विश्वासू,

(गौतम चटर्जी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

*C:\VIDYA\9mtg.memberslist.doc*

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

**विषय : प्राधिकरणाच्या दि. ८.४.२००० रोजी संपन्न झालेल्या नवव्या बैठकीचे कार्यवृत.**

| | | |
|---|---|---|
| **बैठकीचे ठिकाण** | : | सहयाद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई. |
| **बैठकीची वेळ** | : | दुपारी २ ते ३. |
| **उपस्थितांची यादी** | : | सोबत जोडली आहे. |

**बाब क्र. ९/१ : विषय:- प्राधिकरणाच्या दि. ७.१२.१९९८ रोजी झालेल्या नवव्या बैठकीचे कार्यवृत स्थायी करणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची आठवी बैठक दि. ७.१२.९८ रोजी संपन्न झाली. या बैठकीचे कार्यवृत्त मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दि. २५.१.९९ रोजी मंजूर केले होते. हे कार्यवृत्त प्राधिकरणाच्या नवव्या बैठकीत स्थायी करण्यासाठी सादर करण्यात आले. कार्यवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात आल्या होत्या. नवव्या बैठकीच्या वेळी सदर कार्यवृत्तावर काही सूचना अथवा बदल सुचवावयाचे आहे का, असे मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी विचारले. मा. सदस्यांनी सदर कार्यवृत्तांत कोणतेही बदल न सुचविल्याने आठव्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्यात आले.

**ठराव क्र.९.१.१:-**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि. ७.१२.९८ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

**बाब क्र.९/२ : विषय :- प्राधिकरणाच्या दि. ७.१२.९८ रोजी झालेल्या बैठकीनंतर केलेल्या कामाचा गोषवारा.**

**अ) कामाचा प्रगती अहवाल :-** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत मार्च २००० अखेरपर्यंत प्राधिकरणाकडे एकूण ६३९ पुनर्वसन प्रस्ताव प्राप्त झाले असून विकासकांनी ठराविक मुदतीत काम चालू न केल्यामुळे १७१ योजना दप्तरी दाखल करण्यात आल्या असून ३७९ मंजूर प्रस्ताव कार्यरत आहेत. उर्वरित ८९ प्रस्तावांची छाननी चालू असून

मुख्यत्वे करून मंजूरी साठीचे आवश्यक दस्तऐवज व सुधारित नकाशे इ.वास्तुविशारदांना सादर करणे बाकी असल्याने ते प्रलंबित आहेत.

मंजूर केलेल्या प्रस्तावामध्ये एकूण ७९,६२७ एवढया पुनर्वसन सदनिकांचा अंतर्भाव आहे. त्यापैकी २५५ योजनेअंतर्गत ३३,४९८ पुनर्वसन सदनिकांना बांधकाम चालू करण्याचा दाखला देण्यात आलेला आहे. तसेच मार्च २००० अखेर ५३०६ झोपडपट्टीवासियांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. वरील प्रगती अहवालाचे प्राधिकरणाने नोंद घेतली.

**ब) दि.३०.११.१९९९ रोजी "झोपडपट्टी पुनर्वसन-नवे शतक - नवी दिशा" या विषयावर झालेल्या चर्चासत्रातील महत्वाच्या शिफारशी.**

दि.३०.११.१९९९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने " **झोपडपट्टी पुनर्वसन, नवे शतक-नवी दिशा**" या विषयावर एक दिवसीय चर्चा सत्र यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र येथे आयोजित केले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन मा.उपमुख्य मंत्री यांचे हस्ते झाले. चर्चासत्राच्या समारोप समारंभास मा.मुख्यमंत्री उपस्थित होते. तसेच या चर्चासत्राचे अध्यक्ष स्थानी मा.गृहनिर्माण मंत्री हे होते. या चर्चासत्रात विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी, विकासक व वास्तुशास्त्रज्ञ यांचे प्रतिनिधी, संबंधित शासकीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सदस्य व गृहनिर्माण क्षेत्रातील तज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते.

या चर्चासत्रातून खालील शिफारशी प्रामुख्याने आढळून आल्या :-

**शिफारशी :**

१. मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या समस्यांचे निवारण कोणत्याही एका योजनेवर अवलंबून न राहता झोपडपट्टीवासियांना वेगवेगळे विकल्प उपलब्ध करून देणे (Cafeteria approach )आवश्यक आहे. या विकल्पामध्ये झोपडपट्टी सुधार योजना, झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना ज्यामध्ये झोपडपट्टीवासियांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिनीचा भाडेपट्टा देण्यात येतो, झोपडपट्टीवासियांच्या सहकारी गृहनिर्माण

संस्थेमार्फत पुनर्बांधणी, झोपडपट्टीवासियांना विकासकामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन इत्यादी असू शकते. मात्र शासनाने आतापर्यंत हाती घेतलेले झोपडपट्टी पुनर्विकास/पुनर्वसन योजनेखालील प्रकल्प यापुढे ही चालू ठेवावे व प्रकल्प पूर्णत्वास न्यावे.

२. झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन ही एक प्रक्रीया असून त्या प्रक्रीयेत लाभधारक झोपडपट्टीवासियांच्या सहभागाची आवश्यकता आहे. या मुद्याची जाणीव ठेवून झोपडपट्टीवासियांना मोठया प्रमाणावर कसा सहभाग करून घेता येईल असे धोरण आखणे आवश्यक आहे. झोपडपट्टीवासियांचा सहभाग सहकारी संस्थाच्या माध्यमातून सुध्दा अंमलात आणता येईल मात्र अशा संस्था स्थापन करतांना म्हाडा किंवा महानगरपालिका यांचेकडे कार्यरत असलेले समाज विकास अधिकाऱ्यांची मदत घेणे आवश्यक आहे. तसेच सेवाभावी संस्थाना सुध्दा या प्रक्रीयेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

३. झोपडपट्टीवासियांची पात्रता ठरविण्यासाठी शासनाने निश्चित केलेला १.१.९५ दिनांक कायम ठेवण्यात यावा. सर्व पात्र झोपडपट्टीवासियांचे सर्वेक्षण करून त्यांना फोटोपास देण्यासाठी शासनाने आवश्यक पाऊल उचलावे. असे केल्यावर योजना चांगल्या रितीने राबविण्यासाठी एक उपयुक्त असा डेटाबेस उपलब्ध होवू शकेल. सर्वेक्षण व डेटाबेस तयार करतांना सुध्दा शासनाने लाभधारक व सेवाभावी संस्था यांना सहभागी करून घ्यावे.

४. नवीन अतिक्रमणावर त्वरित आळा घालण्यासाठी शासनाने आवश्यक उपाययोजना आखून त्वरित अंमलात आणावी. राजनितीक एकमत असल्यास, १.१.१९९५ नंतर झालेले अतिक्रमण हटविण्यात यावे.

५. शासनाची भूमिका या सर्व योजनामध्ये मददगाराची असावी. शासनाने विकासक किंवा वित्त पुरवठा करणारी संस्था म्हणून काम करू नये.

६. म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासारखी संस्था यांना बळकट करणे

आवश्यक आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी गृहनिर्माणाचे काम म्हाडाने मोठया प्रमाणावर करणे आवश्यक आहे.

७. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण एक मददगाराच्या भूमिकेबरोबर खाजगी विकासकांवर एक प्रभावशाली नियंत्रकाची भूमिकासुध्दा निभावणे आवश्यक आहे.

८. भविष्यात शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांची भूमिका काय असावी हे ठरविण्यासाठी त्याचे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे.

९. झोपडपट्टी सुधार योजनेमध्ये सुध्दा बदल करण्याची आवश्यकता आहे. बदल करतांना खालील गोष्टी विचारात घेण्यात याव्यात.

अ) झोपडपट्टीमध्ये सहकारी संस्था स्थापन करून लोकांना सहभागी करता येईल किंवा कसे,

ब) शासनाने ठरविलेल्या दरडोई खर्चामध्ये वाढ करता येईल किंवा कसे,

क) झोपडीची दुरूस्ती करतांना १४ फूटापर्यंत बांधकामास परवानगी देता येईल किंवा कसे,

१०. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मोफत घर योजना असू नये यासाठी योग्य सुधारणा करण्यात यावी. तसेच या योजनेची अंमलबजावणी करतांना पारदर्शकता असावी या तत्वाचे काटेकोरपणे पालन व्हावे. तसेच योजनेमध्ये अजूनही काही सुधारणा करून खालील अडथळे दूर करण्यात यावेत.

अ) संक्रमण शिबिरे पुरेसे न मिळणे,

ब) सीआरझेडच्या अधिसूचनेमुळे चटई क्षेत्र निर्देशांकावर असलेले बंधन.

क) सहभागी न होणाऱ्या झोपडपट्टीवासियांनी निर्माण करीत असलेले अडचणी.

११. वरील शिफारशीबद्दल तपशील ठरविण्यासाठी शासनाने एक उच्च स्तरीय समिती गठण करावी. अशा शिफारशी राजकीय पक्षाच्या एकमताने झालेले असल्याने या शिफारशींच्या आधारावर आखलेले शासनाचे धोरण दूरगामी असावे व त्याचे वेळोवेळी पुनर्विलोकन करण्याची त्यात तरतूद असावी.

वरील शिफारशीं शासनाकडे योग्य ते निर्णय घेऊन पुढील कार्यवाही

करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत. प्राधिकरणाने वरील बाबीची नोंद घेतली.

**क) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करावयाच्या बदलाबाबत नियुक्त केलेली मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये योग्य ते बदल करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने दि.२८ मे १९९८ च्या शासन निर्णयाव्दारे मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती गठण केली होती. सदर समितीने केलेल्या काही सूचना अंमलात आणण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणेची प्रक्रीया चालू करण्यात आली होती. मात्र दि.७ फेब्रुवारी २००० च्या शासन निर्णयानुसार मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. म्हणून विकास नियंत्रण नियमावलीतील करावयाच्या दुरूस्तीबद्दल जो प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे तो प्रस्तावसुध्दा उच्चाधिकार समितीपुढे विचारार्थ ठेवण्याबद्दल गृहनिर्माण विभागास कळविण्यात आलेले आहे. यावर मा.अध्यक्ष यांनी त्वरित कार्यवाही करावी अशी सूचना दिली. या बाबीची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**ड) तरतूद क्र.३.११ अन्वये अति महत्वाच्या प्रकल्पाखालील,झोपडपट्टीने व्याप्त जमिनी मोकळया करून घेणेसाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प राबवित असलेल्या प्रकल्पांची थोडक्यात माहिती.**

विकास नियंत्रण नियम ३३(१०) मधील तरतूद क्र.३.११ अनुसार शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने तीन ठिकाणी योजना हाती घेतल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

तुर्भे मंडाले येथील सुमारे ५ हेक्टर सरकारी मालकीच्या जमिनीवर अंदाजे २६ इमारती बांधण्यात येत असून त्यातून ३५०० सदनिका उपलब्ध होतील. सदर सदनिका रेल्वेच्या प्रकल्पग्रस्तांना दिले जातील.

दिंडोशी गोरेगांव येथे सुमारे ५.५ हेक्टर क्षेत्रावर ४८ इमारतीत २६०० सदनिका बांधल्या जात आहेत. विमानतळाला लागून असलेल्या केंद्र सरकारी जमिनीवरच्या प्रकल्पग्रस्तांना या सदनिका उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे.

वडाळा येथे सुमारे १३००० चौ.मी. क्षेत्रावर अंदाजे ६०० सदनिका रेल्वे प्रकल्पग्रस्तांसाठी तयार होत आहेत. अशा प्रकारे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाने हाती घेतलेल्या प्रकल्पातून सुमारे ६६०० सदनिका नजीकच्या काळात उपलब्ध होतील. वरील माहितींची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**ई) तरतूद क्र.३.१२ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास मिळणाऱ्या पीएपी गाळे प्राधिकरणाच्या ठराव क्र.८/४/२ ठरावानुसार शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास दिले गेलेल्या सदनिकांची व त्यामुळे मोकळया झालेल्या जमिनी यांची माहिती.**

विकास नियंत्रण नियम ३३(१०) मधील तरतूद क्र.३.१२ प्रमाणे भूखंडावरील पुनर्वसन घटकाची किमान घनता ही प्रती निव्वळ हेक्टरी ५०० गाळे एवढी असेल. त्यामुळे झोपडपट्टी रहिवाशांना द्यावयाच्या गाळयांची संख्या किमान घनतेपेक्षा कमी असेल तर उर्वरित अतिरिक्त गाळे प्रकल्प बाधित पात्र झोपडपट्टीवासीयांना उपलब्ध होतात.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास मिळणाऱ्या प्रकल्प बाधितांसाठीचे गाळे प्राधिकरणाच्या ठराव क्र.८/४/२ प्रमाणे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास हस्तांतरीत करण्याचे ठरले आहे. त्यानुसार आतापर्यंत २०७ पीएपी गाळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्पास दिले आहेत व हे गाळे महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास प्राधिकरणाने मुंबईत (एम.एस.आर.डी.सी.) हाती घेतलेल्या प्रकल्पांनी बाधित होणाऱ्या पात्र झोपडीधारकांना देण्याचे प्रस्तावित आहे. नजिकच्या काळात सुमारे आणखिन ३०० पीएपी गाळे उपलब्ध होतील.

वरील बाबीची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र. ९/३ विविध शासकीय विभागांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत.**

१. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३३ (१०)चे परिशिष्ट चार मधील तरतूद क्र. ६.१ ते ६.२६ यास मंजूरी मिळणे नगर विकास विभागाकडे प्रलंबित

आहे. मुख्य अग्नीशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी ह्यासंबंधी उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्राधिकरणाने पत्र क्र. झोपुप्रा/उसंनर/विनिनि/४७९, दि. १-४-१९९८ अन्वये अभिप्राय दिले असून नगर विकास विभागास पुढील कार्यवाहीची विनंती केलेली आहे.

यावर मा.अध्यक्ष यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना त्वरित कार्यवाही करून मंजूरी देण्याबाबत सूचना दिली.

२. झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीशील करण्यासाठी मा.मंत्री, गृहनिर्माण यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने त्यांचे दि. १-१२-९८च्या बैठकीच्या अनुषंगाने केलेल्या शिफारशीनुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१-ब) अन्वये विहीत कार्यवाही पूर्ण करून प्राधिकरणाचे पत्र क्र.एसआरए/डीडीटीपी/डीसीआर/२३०५, दि. १२-५-१९९९ अन्वये नगर विकास विभागास मंजुरीसाठी सादर केलेला होता. मात्र नव्याने अस्तित्वात आलेल्या उच्चाधिकार समितीने त्यावर पुनर्विचार करीत असून उच्चाधिकार समितीकडे सदर प्रस्ताव प्रलंबित आहे.

यावर मा.अध्यक्ष यांनी मा.मंत्री, गृहनिर्माण यांना उच्चाधिकार समितीची बैठक लवकरात लवकर घेऊन एक महिन्याच्या आत विकास नियंत्रण नियमावलीत करावयाच्या बदलाबाबत निर्णय घ्यावा, अशी सूचना दिली.

३. समुद्र किनारपट्टी नियमन क्षेत्रामध्ये चालू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना किती चटईक्षेत्र निर्देशांक लागू करावा याबाबत नगरविकास विभागाकडून योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना प्राधिकरणाचें पत्र क्र. एसआरए/डीडीटीपी/सीआरझेड/३८९२ दि.२३.९.१९९९

अन्वये संदर्भ केलेला आहे. त्यावर अद्याप गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरणास अशी माहिती दिली की, १९८९ च्या प्रारूप विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र.३१(एच) अनुसार झोपडपट्टी पुनर्विकासासाठी त्या विभागातील चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा २५ टक्के जादा चटई क्षेत्र मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना व त्या पुढील चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून द्यावयाचे असल्यास अनिर्बंध चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याचे अधिकार शासनास होते व सदर तरतूद क्र.३१(एच) दि.१९.२.१९९१ पूर्वी अंमलात होते व शासन त्या तरतूदींच्या आधारे झोपडपट्टी पुनर्विकासासाठी कितीही चटई क्षेत्र वाढवून देऊ शकत होते किंवा कसे याबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय नगर विकास विभागाने मागविले होते. ॲडव्होकेट जनरल यांनी आपले मत नगर विकास विभागास दि.६.४.२००० रोजी कळविले आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकरणास दिली. व सदर अभिप्रायाच्या आधारे शासनाने समुद्र किनारपट्टीमुळे बाधित झालेल्या प्रकल्पांना गती येण्यासाठी त्वरित झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणास २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास आदेश द्यावेत अशी विनंती केली. प्रधान सचिव नगर विकास यांनी या विषयावर मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांची एक बैठक घेऊन, या विषयावर चर्चा करून, लवकरच शासनाचा निर्णय प्राधिकरणास कळविण्यात येईल असे सांगितले.

४. महाराष्ट्र शासनाच्या दि.३०.९.१९९६ च्या राजपत्रातील अध्यादेश क्र.१५, सन १९७१ चा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम कलम ३(अ) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अस्तित्वात आले व त्यास निगम निकायचा दर्जा प्राप्त झाला आहे. सदर नियमाच्या कलम ३, पोटकलम प(२) नुसार या प्राधिकरणाचे लेख्यांचे लेखापरिक्षण भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक

यांचेकडून करवून घेण्याबाबत प्राधिकरणाने सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय यांना पत्र क्र.झोपुप्रा/लेखा/लेखापीरक्षण/१७१८, दि.१८ऑगस्ट१९९८ अन्वये कळविले आहे. याच संदर्भात क्र. क्र.झोपुप्रा/लेखा/लेखापीरक्षण/३३७१, दि.१७ जुलै १९९९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. शासनाने सदर नेमणूक त्वरेने करावी अशी विनंती शासनास करण्यात यावी.

या विषयाबाबत शासनाने कार्यवाही केलेली असल्याने सदर बाब रद्द करण्यात यावी असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले व ते मान्य झाले.

४. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर दोन नायब तहसीलदार यांची नियुक्ती करणेसाठी पत्र क्र. अशाप/झोपुप्रा/नियुक्ती/प्र.क्र.२/प्रशा/४१६६, दि.२.११.१९९९ अन्वये प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांना प्रस्ताव पाठविला होता. तसेच सचिव, प्राधिकरण या पदासाठी अप्पर जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी नेमण्याबाबत दि.२१.२.२००० अन्वये कळविले आहे. त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. मात्र ३.१२.१९९९ रोजी आयुक्त कोकण विभाग यांनी असे दोन नायब तहसिलदार उपलब्ध करून देता येणार नाही असे कळविले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, श्री.बी.एस.कोळसे यांची सचिव,प्राधिकरण या पदावर अलिकडेच नियुक्ती केली आहे व सचिव, प्राधिकरण यांनी दोन नायब तहसिलदारांच्या सेवा प्रतिनियुक्तीवर मिळवून देण्याबाबत आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे पाठपुरावा करतील म्हणून हा विषय चर्चेतून वगळण्यात आला.

**बाब क्र.९/४ सन १९९७-९८ व १९९८-९९ या अर्थसंकल्पाचे वार्षिक अहवाल स्वीकृत करणे व त्यास मान्यता देणे.**

सन १९९७-९८ व सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात आले. मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी वरील दोन्ही वार्षिक अहवालातील ठळक वैशिष्ठे प्राधिकरणास विषद केले. प्राधिकरणाने वरील दोन्ही वार्षिक अहवाल स्वीकृत करून त्यास मंजूरी दिली.

**ठराव क्र. ९.४.२** मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी ठेवलेले सन १९९७-९८ व ९८-९९ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल स्वीकृत करण्यात येऊन त्यांना मंजूरी देण्यात येत आहे.

**बाब क्र. ९/५ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा सन १९९९-२००० च्या सुधारित अर्थसंकल्पास व सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पास मान्यता प्रदान करणेबाबत.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांच्या स्तरावर सन १९९९-२००० चा अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. त्यामध्ये नोव्हेंबर १९९९ पर्यत झालेला प्रत्यक्ष जमा खर्च रक्कमेचा विचार करून आता सुधारित करण्यात आला आहे. त्यातील माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकरणास दिली व त्याचबरोबर सन २०००-२००१ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पाचे आकडेसुध्दा प्राधिकरणास समजावून सांगितले. प्राधिकरणाने सन १९९९-२००० च्या सुधारित अर्थसंकल्पास तसेच सन २०००-२००१ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मान्यता दिली.

**ठराव क्र. ९.५.३** मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी सादर केलेले सन १९९९-२००० च्या सुधारित अर्थसंकल्पास तसेच सन २०००-२००१ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्र.९/६ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास)अधिनियम, १९७१ मधील कलम ३-सी, ३-आय, ३-ओ व ३-पी खाली प्राधिकरणाने करावयाच्या विनियमाबाबत.**

प्रकरण १-अे मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना, त्यांचे अधिकार, कर्तव्ये व कामे इ.बाबत तरतूद आहे. काही कलमामध्ये प्राधिकरणाने विनियम करणेची तरतूद आहे.

कलम ३ व्हीनुसार सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी जेथे आवश्यक आहे तेथे प्राधिकरणास विनियम करता येतील. सध्या खालील कलमाखाली विनियम करणे आवश्यक आहे.

(१) **कलम ३सी -** एखाद्या झोपडपट्टीतील पुनर्वसन योजना राबवितांना काही लोक अडथळे निर्माण करतात व स्वत:चे झोपडे तोडू देत नाहीत अशा वेळी सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या कलमाव्दारे दिले आहेत. मात्र सदर घोषणा प्रसिध्द कशी करावी याबाबतची पध्दत प्राधिकरणाने ठरवून दिल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे. आतापर्यंत १७ ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घोषित केले आहे. सदरहू ठिकाणे Censused slum किंवा Notified slum असल्याने व त्या ठिकाणी योजना मंजूर करतांना किमान ७०% लोकांनी संमती दिली असल्याने, कलम ३ सी खाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र मंजूर करतांना एक इंग्रजी व एक मराठी असे दोन स्थानिक वृत्तपत्रामध्ये ती अधिसूचना प्रसिध्द करणेची पध्दत अवलंबिली आहे. सदर पध्दतीस प्राधिकरणाने मान्यता द्यावी असे प्रस्तावित करण्यात आले व ते प्राधिकरणाने मान्य केले.

**ठराव क्र.९.६.४** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३-सी खाली .झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र. घोषित करण्यासाठी एक इंग्रजी व एक मराठी असे स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात यावी. या प्रसिध्दी करण्याच्या पध्दतीस प्राधिकरण मंजूरी देत आहे.

(२) **कलम ३-आय-** प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती शासन करीत असते. त्यांना शासनाच्या सचिवांना असलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्राधिकरणाने यापूर्वीच दिले आहेत. प्राधिकरणास जरूरी असलेल्या इतर अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती शासकीय सेवेतील व मुंबई महानगरपालिकेच्या

सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीने प्रतिनियुक्तीने किंवा जेथे प्रतिनियुक्तीने मिळत नव्हते तेथे कंत्राटी पध्दतीने केली आहे.

आजमितीस प्राधिकरणाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त प्रतिनियुक्तीने महाराष्ट्र शासनाचे, मुंबई महानगरपालिकेचे व म्हाडाचे अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ५१ , कंत्राटी पध्दतीने ज्यामध्ये लघुलेखक, लिपिक-टंकलेखक,शिपाई इ. एकूण १४ व मुंबई उच्च न्यायालय, सिटी सिव्हिल कोर्ट, झोपडपट्टी न्यायाधिकरण यामधील काम चालविणेसाठी विधी सल्लागार म्हणून ३ व संगणक सल्लागार म्हणून १ असे एकूण चार सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. याची माहिती मुख्य कार्यकारी अधकारी यांनी प्राधिकरणास दिली.

जे अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांना शासकीय परसेवा नियम लागू आहेत. जे कर्मचारी कंत्राटी पध्दतीने आहेत त्यांना खालील नियम लागू केलेले आहेत.

१. त्यांचे वेतन महाराष्ट्र शासनाच्या संबंधित श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या प्रारंभिक वेतनावर आधारीत एकत्रित वेतनाएवढे असेल.
२. या नियुक्त्या पूर्णत: तात्पुरत्या स्वरूपाच्या असतील.
३. सेवा कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा व इतर सवलती अनुज्ञेय नाही.
४. शासकीय सर्व सुट्टया, नैमित्तीक रजा व कार्यालयीन वेळ या कर्मचाऱ्यांना लागू असतील.
५. नैमित्तीक रजा व्यतिरिक्त गैरहजर राहिल्यास त्यांना त्या दिवसाचे वेतन देय होणार नाही.
६. कर्मचाऱ्यास आपल्या सेवेचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास किमान एक महिन्याची पूर्व सूचना प्राधिकरणास द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे वेतनाची रक्कम प्राधिकरणास भरणे.
७. प्राधिकरणास उमेदवाराच्याा सेवेची आवश्यकता नसल्यास, प्राधिकरण तशी पूर्व सूचना देऊन अथवा कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता सेवा संपुष्टात आणेल.

विधी सल्लागारांच्या बाबतीत त्यांना A grade panel counsel च्या दराने फी दिली जाते. मात्र संगणक सल्लागार यांना त्यांच्या ज्ञानाच्या व कामाच्या अनुभवावरून रू.१०,००० दरमहा एवढे एकत्रित वेतन अदा करण्यात येत आहे. कंत्राटी पध्दतीवरील व सल्लागार पध्दतीने असलेले कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने ते प्राधिकरणाचे कर्मचारी होत नाहीत. म्हणून कलम ३-आय प्रमाणे प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती व सेवेच्या अटीसाठी वेगळे विनियम करण्याची तुर्त आवश्यकता नाही. यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठराव क्र.९.६.५** कंत्राटी पध्दतीवरील व सल्लागार पध्दतीने असलेले कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने ते प्राधिकरणाचे कर्मचारी होत नाहीत. म्हणून कलम ३-आय प्रमाणे प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती व सेवेच्या अटीसाठी वेगळे विनियम करण्याची तुर्त आवश्यकता नाही.

(३) **कलम ३- ओ** - या कलमान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये वार्षिक वित्तीय निवेदन (Annual Financial Statement) व कामाचा कार्यक्रम (Programme of Works) राज्य शासनाकडे पाठवावयाचा आहे. परंतु प्राधिकरण कोणत्याही प्रकारचा प्रकल्प राबवित नसल्याने वार्षिक वित्तीय निवेदन तयार करण्याचा व कामाचा कार्यक्रम आंखण्याचा प्रश्न उदभवत नाही. त्यामुळे दरवर्षी याबाबतचा अहवाल निरंक म्हणून पाठविण्यात आलेला आहे. भविष्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रकल्प राबवावयाचा ठरविल्यास असे वित्तीय निवेदन व कामाचा कार्यक्रम प्राधिकरणाची मंजूरी घेवून शासनास सादर करण्यात येईल. याबाबतीत खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठराव क्र.९.६.६** प्राधिकरण कोणत्याही प्रकारचा प्रकल्प राबवित नसल्याने वार्षिक वित्तीय निवेदन तयार करण्याचा व कामाचा कार्यक्रम आंखण्याचा प्रश्न उदभवत नाही. मात्र भविष्यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रकल्प राबवावयाचा ठरविल्यास असे वित्तीय निवेदन व कामाचा कार्यक्रम प्राधिकरणाची मंजूरी घेवून शासनास सादर करण्यात यावा.

(४) **कलम ३-पी** – प्राधिकरण धंदा व व्यवहार संबंधात लेखा पुस्तके व इतर पुस्तके ठेवीत आहे. सदर लेख्यांचे लेखा परिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याकडून करवून घेणेसाठी शासनाकडे दि.१८.८.१९९८ रोजी प्रस्ताव पाठविला आहे. दि.१७.७.१९९९ रोजी स्मरणपत्रही पाठविले आहे. मात्र अद्याप भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याकडून लेखा परिक्षकाची नेमणूक झालेली नाही. त्यासाठी असा प्रस्ताव आहे की, प्राधिकरणाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चार्टर्ड अकाऊंट याची नेमणूक करून त्यांच्यामार्फत तात्पुरते ऑडीट करून घेण्यास मंजूरी द्यावी.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सल्ल्याने राज्य शासनाने लेखा परिक्षकांची नेमणूक केल्यावर लेख्यांची तपासणी होवून लेखावरील लेखा परिक्षण अहवालासह राज्य शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

या बाबींची नोंद प्राधिकरणाने घेतली व भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याकडून लेखा परिक्षकाची नेमणूक अद्याप झालेली नसल्यामुळे चार्टर्ड अकाऊटं यांची नेमणूक कडून त्यांच्यामार्फत तात्पूरते ऑडीट करून घेण्यास मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्र.९.६.७.** प्राधिकरणाचे धंदा व व्यवहार संबंधात लेखा पुस्तके व इतर पुस्तके ठेवीत आहे. सदर लेख्यांचे लेखा परीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याकडून नेमल्या गेलेल्या लेखा परिक्षकांकडून करून घेण्याचे आहे. अशा लेखापरिक्षकांची नेमणूक झालेली नाही व तशी नेमणूक होण्यास कालावधी लागेल म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चार्टर्ड

अकाऊटंट यांची नेमणूक करून त्यांच्या मार्फत तात्पूरते अंतर्गत ऑडिट करून घ्यावे या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्र.१०** मा.अध्यक्षांच्या परवानगीने खालील विषय चर्चिले गेले.

१. श्री.के.नलिनाक्षन, आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी मुंबई उच्च न्यायालयाने दौलत नगर, सांताक्रुझबाबतच्या याचिकेवर दिलेल्या आदेशाची कार्यवाही करणे ताबडतोब शक्य होणार नाही. झोपडपट्टीवासीयांना कोठे व कसे हलवावे यावर विचार करावा लागेल. शिवाय अशा आदेशामुळे मुंबई शहारातील विकास योजनेतील सर्व नियोजित रस्ते वा आरक्षणे यांच्यावरील झोपडपट्टीवासियांना हलवावे लागेल. यासाठी महाराष्ट्र शासन व मुंबई महानगरपालिका यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करणे योग्य होईल. त्यामुळे महाराष्ट्र शासनास व महानगरपालिकेस सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागे तो पर्यंत वरील विषयावर निर्णय घेण्यास थोडासा वेळही मिळेल.

यावर मा.अध्यक्षांनी, मुख्य सचिवांनी संबंधितांची बैठक घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा असे सूचविले.

२. श्री. सुंदर बुरा यांनी मुंबई शहर विकास योजनेतील ना विकास क्षेत्रामध्ये, विकास योजनेमुळे किंवा रेल्वेमुळे किंवा उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टीवासियांना, कांजूर मार्ग येथे राबविली गेलेल्या प्रकल्पाप्रमाणे तात्पूरते हलवावे व नंतर तेथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत प्रकल्प राबवावे. यावर मा.अध्यक्षांनी सध्याच्या ना विकास क्षेत्रामध्ये अनधिकृत झोपडया उभ्या राहत आहेत, अशा ना विकास क्षेत्रांचा उद्दीष्ट साध्य होत नाही, त्यासाठी अशा क्षेत्रांवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविल्यास काही गैर होणार नाही. नगर विकास विभागाने व मुंबई महानगरपालिकेने याबाबत योग्य तो प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी तयार करावा असे सुचविले.

३. श्री. विरेंन्द्र बक्षी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, उपनगरामध्ये जेथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जात आहे तेथे झोपडपट्टीवासियांसाठी बांधल्या जाणाऱ्या प्रत्येक सदनिकेमागे विकासकांनी भरावयाचे मेंटेनन्स चार्जेस रक्कम रूपये २०,०००/- कमी करून रक्कम रूपये १०,०००/- भरण्यासाठी शासनाने मंजूरी दिली आहे का ? त्यांनी असे ही सुचविले की ही रक्कम कमी करण्यात येऊ नये.

यावर मा.अध्यक्ष यांनी असे सांगितले की, वरील विषय शासनाच्या विचाराधीन असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

४. श्री. विरेंन्द्र बक्षी यांनी दुसरा एक मुद्दा उपस्थित केला की,प्राधिकरणाने एखाद्या पुनर्वसन योजनेस मंजूरी देताना खरोखरच ७०% लोकांची संमती आहे की नाही हे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यानी विशेषत: प्राधिकरणातील सहाय्यक निबंधक, सहकार विभाग यांच्यामार्फत तपासून घेणे योग्य होईल. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही सूचना मान्य केली.

या बाबीवर चर्चा झाली. मात्र कोणताही ठराव झाला नाही.

***

तक्ता अ

## दि.८.४.२००० रोजी बैठकीतील निर्णयांची कार्यवाही पूर्ण झालेले मुद्दे

| अ.क्र. | बाब क्र. | बैठकीत झालेले निर्णय | जबाबदारी | दिलेली कायमर्यादा | विभागाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | ९/१ | दि.७.१२.९८ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्यात आले. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | | दि.७.१२.९८ रोजी झालेल्या आठव्या बैठकीचे कार्यवृत्त दि.८.४.२००० रोजी झालेल्या नवव्या बैठकीत स्थायी करण्यात आले. |
| २. | ८/४ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.३३(१०) अंतर्गत तरतूद क्र.३.११,३.१२ तसेच नियम क्र.३३(१४) नुसार उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त सदनिका शिवशाही पुनर्वसन प्रकल्प/म्हाडास हस्तांतरण करण्यात याव्यात. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | | प्रकल्पग्रस्तांसाठी सदनिका शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही केलेली आहे. |
| ३. | ८/५ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीशील करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला व कलम ३७(१ब) खाली कार्यवाही करणेचे ठरले. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७ (१ब) अन्वये प्रक्रिया पूर्ण करून नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. |

तक्ता 'ब'

दि.८.४.२००० रोजी झालेल्या ९ व्या बैठकीतील प्रलंबित मुद्दे

| अ.क्र. | बाब क्र. | बैठकीत झालेले निर्णय | जबाबदारी | दिलेली कायमर्यादा | विभागाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | ९/६ | महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ मधील कलम ३ सी खालील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्यासाठी एक इंग्रजी व एक मराठी असे स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याच्या पध्दतीस प्राधिकरणाने मंजूरी दिली. त्याप्रमाणे परिपत्रक काढणे. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | - | |
| २. | ९/२ | प्राधिकरणाच्या मागील झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीशील करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्याचा निर्णय नव्याने तपासणे व मंजूरी देणे यासाठी उच्चाधिकार समिती त्वरित कार्यवाही करणेची आहे. | सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | एक महिना. | |
| ३. | ९/३.१ | विकास नियंत्रण नियम क्र.३३(१०)चे परिशिष्ट-४ मध्ये तरतूद क्र.६.१ ते ६.२६ शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित. | नगर विकास विभाग | - | |
| ४. | ९/३.३ | सीआरझेडमुळे बाधित प्रकल्पांवर निर्णय घेणे | गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग व मुख्य सचिव | - | |
| ५. | ९/६ | भारताचे नियंत्रक व महालेखा विभाग परिक्षक यांचेकडून लेख्यांचे परिक्षणासाठी नियुक्ती, साठी पाठपुरावा करणे. | गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | |

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक ८/०४/२००० रोजी झालेल्या बैठकीसाठी उपस्थितीतअसलेले सदस्य

| अ.क्र | नाव | हुदा |
|---|---|---|
| १ | मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | मा.मंत्री,गृहनिर्माण | सदस्य |
| ३ | मा.राज्यमंत्री,नगरविकास | सदस्य |
| ४ | मा.राज्यमंत्री,गृहनिर्माण | सदस्य |
| ५ | मुख्य सचिव | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव,नगर विकास | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव,महसूल व वन विभाग | सदस्य |
| ८ | सचिव,गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ९ | महापालिका आयुक्त,मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १० | श्री.चंद्रशेखर प्रभू | सदस्य |
| ११ | श्री.सुंदर बुरा | सदस्य |
| १२ | श्री. विरेंद्र बक्षी | सदस्य |
| १३ | श्री शिरीष पटेल,वास्तुशास्त्रज्ञ | सदस्य |
| १४ | मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |